Review Of Research
Vol. 3, Issue. 2, Nov. 2013
ISSN:-2249-894X Available online at www. lbp.world

ORIGINAL ARTICLE

# भारतीय लोकसंस्कृतीच्या विविधतेतील एकता

**प्रा. डॉ. भास्कर निफाडे**
**पदव्युत्तर अध्ययन व संशोधन केंद्र, रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय,**
**श्रीरामपूर, जि.अहमदनगर.**

## प्रस्तावना:

लोकसंस्कृती म्हणजे लोकांची संस्कृती होय. 'लोक' ही संज्ञा जन, प्रजा, जाती, भुवन, वसतिस्थान इत्यादी विविध अर्थांनी प्रचलित आहे. सर्वसामान्य माणसे, स्वतःचा वेगळा चेहरा नसलेली पण अस्तित्व असलेली सर्वसाधारण माणसे, प्रामुख्याने रोजी-रोटीसाठी जगणारी माणसे असाही 'लोक' या संज्ञेचा अर्थ सांगता येईल. जन्म-मृत्यू सारख्या घटना, शेतीउद्योगाचे कर्मकांड, दिवस-रात्र-नक्षत्रे-ऋतुचक्र या सृष्टिरुपांचा संस्कार, वंशसातत्य आणि आरोग्याची आकांक्षा यांच्याशी 'लोक' आणि 'लोकसंस्कृती' जोडलेली असते. डॉ.ना.गो.कालेलकर म्हणतात, 'लोक म्हणजे एक वेगळया संस्कृतीचे दर्शन घडविणारा वर्ग. ही संस्कृती स्वाभाविकपणे जगते आणि निसर्गाला अधिक जवळची असते. मानवाची ही आद्य संस्कृती नसली तरी ती जुन्यात जुनी अवस्था आहे. ती अवस्था काही माणसांच्या जीवनविषयक सवयींतून, रुढींतून, नृत्यगीतादि कलाप्रकारांतून आढळते'[१]

आज जिला आपण 'भारतीय संस्कृती' म्हणतो तिच्यात प्राचीन काळापासून 'नागर संस्कृती' आणि 'लोकसंस्कृती' अशा दोन सांस्कृतिक धारा वाहात आल्या आहेत. स्थूलमानाने त्या वैदिक आणि वैदिकेतरांच्या होत्या. आज अस्तित्वात असलेला वैदिकआर्य पूर्व/स्थानिक वसाहतकारांच्या परंपरेचा प्रवाह म्हणजे 'लोकसंस्कृती' होय. तिने लोककलांच्या माध्यमातून संस्कृतीच्या वारशाचे संरक्षण आणि संवर्धन केले. तिच्यात समाजजीवनाचे आदिबंध सापडतात. म्हणनूच 'लोकसंस्कृती' ही नागर संस्कृतीची प्रयोगशाळा आहे.'[२] असे रा. चिं. ढेरे यांनी म्हटले आहे.

लोकसंस्कृतीमध्ये धर्म, निती, भाषा, कला, रुढी, सण, उत्सव, चालीरीती, भूपरिसर, दैवतकल्पना, लोकव्यवहार इत्यादींचा समावेश होतो. लोकजीवन सतत गतिमान असते. त्याच्या गतिमानतेचा आविष्कार लोककलांमधून झाल्याशिवाय राहात नाही. भारताच्या प्रदीर्घ इतिहासात अनेक परकीय संस्कृतींशी भारतीय लोकसंस्कृतीचे आदान-प्रदान आणि अभिसरण झाले आहे व त्यामुळे ती उजळून निघाली आहे.

लोकसंस्कृती ही स्थलविशिष्ट असते. भू-परिसरातील निसर्ग आणि प्राणिमात्र लोकसंस्कृतीला विशिष्ट आकार देत असतात. उदा. राजस्थानसारख्या पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या प्रदेशात जेवणाच्या ताटातच हात धुणे प्रशस्त मानले जाते. डोंगरदऱ्यांत राहाणारे लोक वाघासारख्या हिस्र प्राण्याला देवत्व बहाल करतात. नागोबाची पूजा गावोगावी केली जाते. 'कावळा ओरडणे', 'कुत्रे विव्हळणे', 'मांजर आडवी जाणे' या साध्या घटनांच्या देशकालविशिष्ट रुढी होतात. 'पोळा' घाटावरील कृषी जीवनातील आणि 'गौरी गणपती' हा कोकणातील लोकांचा महत्त्वपूर्ण सण मानला जातो. स्थानविशिष्ट वनस्पतींना लोकसंस्कृतीच्या आचारधर्मात विशेष स्थान प्राप्त होते. उदा. आपटयाची पाने, आंब्याची पाने.

लोकसंस्कृतीचे नितळ दर्शन भारतातील विविध प्रांतात प्रचलित असलेल्या वेगवेगळ्या विवाह पध्दतीतून घडते. 'वंशसातत्य' आणि 'लैंगिक संबंधांचे नियंत्रण' हे विवाह संस्थेचे मूळ असल्याची जाणीव लोकसंस्कृतीत आढळते. जातिधर्माप्रमाणे

थोडीफार विविधता असली तरी सर्वत्र विवाह पध्दतीचा आशय सारखाच आढळतो. धर्म वेगळे असले तरी लोकसंस्कृतीतील त्यांच्या आचारधर्मात मात्र सारखेपणा आहे.

'संस्कृती' ही संज्ञा 'संस्कार' या शब्दापासून तयार झाली संस्कार म्हणजे गुणांची निर्मिती आणि दोघांचे निवारण करणे होय. संस्कृतीची पुढील तीन अंगे 'लोकसंस्कृती' तही आढळतात.

**१. माणूस आणि निसर्ग यांची गुणात्मक रचना :**

यामध्ये शेतात पिकवलेल्या धान्यापासून अन्न बनविण्याची क्रिया, माती आणि धातूंपासून भांडी तयार करण्याची क्रिया, शेतीसाठी व दूध दूधदुभत्यासाठी पशुधन सांभाळण्याची क्रिया, झाडपाल्यापासून औषधे निर्माण करण्याची क्रिया इत्यादी अनेक गोष्टींचा समावेश होतो. निसर्गातील पदार्थ – गुणवैशिष्ट्यावर मानवी बुध्दीचा संस्कार होऊन ही नवी मानव निर्मिती घटिते तयार होतात. प्राकृतिक घटितावर मानवी बुध्दीचा संस्कार करण्याच्या प्रक्रियेतूनच संस्कृतीचे रचनाबंध घडत जातात.

**२. माणसामाणसातील संबंधाची गुणात्मक रचना :**

निसर्गावर केलेल्या संस्काराप्रमाणेच माणसाने माणसावर केलेल्या संस्कारातून संस्कृतीच्या या दुसऱ्या अंगाची जडणघडण होते. यातूनच संस्था आणि आचारपध्दतींचा उदय होतो. धर्म आणि धर्माचरण, नीती आणि नीतिव्यवहार, कुटुंबसंस्था, जातिव्यवस्था, राज्यशासनप्रणाली, कायदेपालन इत्यादी अनेक संस्थांची व मानदंडाची निर्मिती मानवाच्या परस्पर संबंधाच्या गुणात्मक रचनेतून निर्माण झालेली दिसून येते.

**३. सर्वक्षेत्रीय मूल्यरचना :**

मानवी जीवन सुखकर होण्यासाठी वेगवेगळ्या 'मूल्यां'ची निर्मिती आणि त्यानुसार आचारधर्म ठरविणे ही संस्कृती निर्मितीतील तिसरी महत्त्वाची प्रक्रिया असते. सत्य, शिव, सुंदर, दया, क्षमा, शांती, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, ज्ञान, प्रज्ञा, विवेक, शीलवर्धन अशी कितीतरी जीवनमूल्ये आणि त्यानुसार वर्तनादर्शाचे नमुने संस्कृतीचा पाया रचत असतात. लोकव्यवहारात आढळणारी मूल्यरचना परंपरागत संकेतांतून आणि प्राचीन ऋषी, मुनी, विचारवंतांनी घालून दिलेल्या आचारपध्दतीतून सिध्द झालेली आहे. भारतातील लोकसंस्कृतीतील या अंतःप्रवाहांनी भारतीय संस्कृतीचा एकजिनसीपणा टिकवून ठेवलेला आहे.

- **समारोप :**

भारताचा सांस्कृतिक वारसा जतन करुन आजच्या काळापर्यंत पोहोचवण्याचे काम लोकसंस्कृतीने केले आहे. पारंपारिकता आणि परिवर्तनशीलता हे तिचे दोन मुख्य विशेष आहेत. प्राचीन काळापासून भारतभूमीवर वेगवेगळे लोकसमूह निरनिराळ्या भूप्रदेशात स्थायिक होत गेले. त्यांची भौतिक, धार्मिक उन्नती होत गेली. समूहांचे रुपांतर सुसंघटित समाजव्यवस्थेत झाले. समूहांना संस्थात्मक जीवनाचा आकार प्राप्त झाला. ही प्रक्रिया होत असताना स्थानिक लोकसंस्कृतीत अमूलाग्र बदल झाले नाहीत. परकीय आक्रमकांनी येथील सांस्कृतिक परंपरांचा स्वीकार केला. त्यांच्या नाण्यांवर भारतीय देवदेवतांच्या मूर्ती कोरलेल्या आढळतात. कालांतराने त्यांची स्वतंत्र वेगळी ओळख उरली नाही. येथील जिवट आणि चिवट लोकसंस्कृतीने समन्वयशील राहून आपले स्वत्व कायम टिकविले. विविध काळांतील विविध धर्मीय आक्रमकांनी निर्माण करण्याचा प्रयत्न केलेल्या धार्मिक भेदमूलक प्रक्रियेला कायमचे थांबवून टाकले. लोकसंस्कृतीतील हे शहाणपण आपल्याला तिच्यातील 'विविधतेतील एकते' चे खरे दर्शन घडविते असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरु नये.

- **संदर्भ :**

१. महाराष्ट्र जीवन, संपा. गं. बा. सरदार, पृ.२०३.
२. लोकसंस्कृतीची क्षितिजे, डॉ. रा. चिं. ढेरे
३. खानदेशातील ग्रामदैवते, सयाजी पगार, प्रस्तावना : डॉ. रमेश वरखेडे, पृ. १३
४. लोकसाहित्य, तारा भवाळकर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन.
५. लोकरंगभूमी : परंपरा, स्वरुप आणि भवितव्य, डॉ. प्रभाकर मांडे.

६. लोकसाहित्य : बदलते संदर्भ, बदलती रुपे, डॉ. गंगाधर मोरजे.
७. लोकसाहित्य आणि लोकपरंपरा, संपा. डॉ. रमेश वरखेडे.
८. लोकसाहित्य मीमांसा : भाग पहिला, डॉ. विश्वनाथ शिंदे.